RNI No. MAHBIL /2012/46121

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग दोन

वर्ष ३, अंक ६७] शुक्रवार, डिसेंबर ८, २०१७/अग्रहायण १७, शके १९३९ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १२०

## प्राधिकृत प्रकाशन

### शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित

**[महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६० च्या उप कलम (२) नुसार]**

**सूचना**

क्रमांक सिडको/नैना/अ.मु.नि/टीपीएस २/बीएन-२७/२०१७.—ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन आणि नगररचना अधिनियम, १९६६ (महा.अधिनियम XXXVII, १९६६) (येथून पुढे उक्त अधिनियम असे निर्देशित करण्यात येईल), च्या कलम ४० च्या उप कलम (१) मधील खंड (ब) द्वारा प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभाग (नविवि) ने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१२/४७५/प्र.क्र.-९८/१२/नवि-१२, दिनांक १० जानेवारी, २०१३ व वेळोवेळी झालेल्या सुधारणा अन्वये त्यात नमूद केल्याप्रमाणे, नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्र (नैना),(येथून पुढे उक्त क्षेत्र असे निर्देशित करण्यात येईल) साठी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (महाराष्ट्र शासनाच्या मालकीची व नियंत्रणाखालील कंपनी) म्हणजे सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण (येथून पुढे वि.नि.प्रा.असे निर्देशित करण्यात येईल) म्हणून नेमणूक केली आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने अधिसूचना क्र. टीपीएस -१२१५/२४५/ सीआर -३३२/ २०१५/एस.एम./यूडी -१२, दिनांक २७ एप्रिल २०१७ नुसार नैनातील २३ गावांसाठी उक्त अधिनियमाच्या कलम ३१ च्या उप कलम (१) अन्वये अंतरिम विकास आराखडा मंजूर केला आहे ज्यामध्ये ऐच्छिक सहभागाची नैना योजना मंजूर झाली आहे ;

आणि ज्याअर्थी, सिडकोच्या संचालक मंडळाने दिनांक ६ डिसेंबर २०१७ रोजीच्या ठराव क्र. ११९७३ अन्वये पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील चिपळे (भाग), देवद (भाग), भोकरपाडा (चिपळे) (भाग), विहीघर (भाग) आणि बेलवली व सांगडे (भाग) (असंलग्न क्षेत्र) येथे नगररचना परीयोजना क्रमांक २ करण्याकरिता, अधिनियमातील कलम ६० च्या उप कलम (१) नुसार त्याचा उद्देश घोषित केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महामंडळाने शासनाकडे उक्त अधिनियमाच्या प्रकरण पाचच्या काही कलमांमध्ये सूट तसेच परीयोजनेच्या सुलभ अंमलबजावणीसाठी सिडकोला अधिकार प्रदान करण्याची विनंती केली आहे.

आता, म्हणून शासनाकडून विशेषाधिकार आणि प्रकरण पाचच्या काही कलमांमध्ये सूट मिळणार आहे असे गृहीत धरून उक्त अधिनियमाच्या कलम ६० च्या उप कलम (२) द्वारा प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महामंडळ पनवेल तालुक्यातील रायगड जिल्ह्यातील चिपळे (भाग), देवद (भाग), भोकरपाडा (चिपळे) (भाग), विहीघर(भाग) आणि बेलवली व सांगडे (भाग) (असंलग्न क्षेत्र) येथे नगररचना परीयोजना क्रमांक २ घोषित करत आहे.

विषयांकित परियोजनेतील जमीन मालकांने त्यांच्या जमिनींवरील प्राप्त केलेले प्राधिकृत बांधकाम परवानगी तसेच अकृषक परवान्याच्या प्रती या कार्यालयात सादर करावे. त्याचप्रमाणे ज्या जमीन मालकांना एकत्रित भूखंड प्राप्त करुन घेण्यास इच्छुक असतील त्यांनी तसे संमतीपत्र सिडकोच्या नैना कार्यालयात सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत सादर करण्यात यावे.

नगररचना परीयोजना क्रमांक २ मध्ये अंतर्भूत असलेल्या क्षेत्राची सीमा नकाशात निळ्या रंगाने दर्शविली असून त्याची चतु:सीमा खालील परिशिष्टप्रमाणे आहे :—

**परिशिष्ट**

| स्थळ<br>(१) | गाव<br>(२) | परियोजनेची सीमा<br>(३) | (अंदाजित) क्षेत्र (हे.)<br>(४) |
|---|---|---|---|
| नगररचना परीयोजना क्रमांक २ पॉकेट क्र. १ | चिपळे (भाग), विहीघर (भाग), देवद (भाग), भोकरपाडा (चिपळे) (भाग) | **उत्तरेस**<br>• काळुंद्री नदी (पनवेल-माथेरान पायथा रस्ता) पर्यंत.<br>• पनवेल-माथेरान पायथा रस्त्याची उत्तरेकडील सीमा<br>• चिपळे व कोपरोली गावांची सामाईक सीमा.<br>**दक्षिणेस**<br>• देवद व विचुंबे गावांची सीमा.<br>• देवद व शिवकर गावांची सीमा.<br>• भोकरपाडा (चिपळे) व शिवकर गावांची सामाईक सीमा.<br>**पूर्वेस**<br>• भोकरपाडा (चिपळे) व बोनशेत गावांची सामाईक सीमा.<br>• चिपळे व बोनशेत गावांची सामाईक सीमा.<br>• चिपळे व विहीघर गावांची सामाईक सीमा.<br>**पश्चिमेस**<br>• मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग. | १६६. ०० |
| नगररचना परीयोजना क्रमांक २ पॉकेट क्र. २ (असंलग्न क्षेत्र) | सांगडे (भाग) आणि बेलवली (भाग) | **उत्तरेस**<br>• किरकी नदीची सीमा.<br>• चिखले व सांगडे गावांची सामाईक सीमा<br>• चिखले व बेलवली (भाग) गावांची सामाईक सीमा.<br>**दक्षिणेस**<br>• मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग व प्रस्तावित मल्टी मोडल कॉरीडॉर (एम.एम.सी) यांना जोडणाऱ्या प्रस्तावित १० मीटर रुंदीचा रस्त्याची हद्द.<br>• सांगडे व बेलवली (भाग) गावांची सामाईक सीमा.<br>**पूर्वेस**<br>• प्रस्तावित मल्टी मोडल कॉरीडॉर (एम.एम.सी) (भाग)<br>• बेलवली (भाग) गावाची जमीन.<br>**पश्चिमेस**<br>• किरकी नदीचा भाग.<br>• सांगडे व बोरले गावांची सामाईक सीमा | २८.०० |
| | | **एकूण क्षेत्र** | १९४. ०० |

कलम ६० च्या उप कलम (३) च्या तरतुदींनुसार, नगररचना परीयोजना क्रमांक २ ची घोषणा व त्यामध्ये समाविष्ट करण्यात आलेले क्षेत्र दाखविणाऱ्या नकाशाच्या प्रती खालील नमूद केलेल्या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत जनतेच्या तपासणीसाठी उपलब्ध आहेत. विषयांकित परियोजनेचे नकाशे संबंधित गावांच्या ग्रामपंचायत कार्यालयात तपासणीसाठी उपलब्ध राहील. सदर सूचना व नकाशा सिडकोच्या संकेतस्थळ http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx येथे उपलब्ध आहे.

- अतिरिक्त मुख्य नियोजनकार (नैना), ८वा मजला, टॉवर नं. १०, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
- मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार, ४ था मजला, नियोजन विभाग, सिडको भवन ,सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४
- सिडको नोंदणीकृत कार्यालय : निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१
- संबंधित ग्रामपंचायत कार्यालये.

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या आदेशानुसार,

**व्ही. वेणू गोपाल,**

अतिरिक्त मुख्य नियोजनकार (नैना).

**नोंदणीकृत कार्यालय :** निर्मल, २ रा मजला, नरीमन पॉईंट, मुंबई ४०० ०२१.

दिनांक ८ डिसेंबर २०१७.

## CITY AND INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.

### Notice

(Under section 60(2) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966)

No. CIDCO/NAINA/ACP/BN-27/2017

Whereas, the Government of Maharashtra in exercise of powers conferred under clause (b) of sub-section (*1*) of the section 40 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") declared by Notification, No. TPS -1712/475/CR-98/12/ UD-12: dated the 10th January 2013 and subsequent amendment (hereinafter referred to as "the said Notification") City and Industrial Development Corporation of Maharashtra Limited (being a company owned and controlled by the Government of Maharashtra) (hereinafter referred to as "the Corporation") as Special Planning Authority (hereinafter referred to as "the SPA") for Navi Mumbai Airport Influence Notified Area (NAINA) (hereinafter referred to as "said notified area") as specified therein ;

And whereas, the Government of Maharashtra *vide* Notification No. TPS-1215/245/CR-332/ 2015/SM/UD-12, dated the 27th April 2017 has sanctioned the Interim Development Plan for the 23 villages of NAINA under section 31(1) of the said Act, wherein the voluntary participatory NAINA Scheme was approved ;

And whereas, the Board of CIDCO *vide* Resolution No. 11973, dated the 6th December 2017 had declared its intention under sub-section (*1*) of section 60 of the said Act, for making of Town Planning Scheme No.2 at Village- Chipale (Part), Vihighar (Part), Devad (Part), Bhokarpada (Chipale) (Part) and Belavali (Part) and Sangade (Part) (non-contiguous pockets) of Taluka Panvel, District Raigad ;

And whereas, the Corporation had sought relaxation/waivers for variations in parameters of certain sections of Chapter V of the said Act, and delegation of powers to CIDCO for smooth implementation of TPS ;

Now, therefore, in anticipation of grant of relaxation and delegation sought from the Government under Chapter-V of the said Act and in exercise of the powers conferred by sub-section (*2*) of the section 60 of the said Act, the Corporation hereby publishes its declaration of making TPS No. 2 at Village Chipale (Part), Vihighar(Part), Devad(Part), Bhokarpada (Chipale) (Part) and Belavali(Part) and Sangade(Part) (non-contiguous pockets) of Taluka Panvel, District Raigad ;

Land owners who have authorized building permission/NA permission falling within the boundary of proposed TPS No. 2 may submit the details in NAINA office. Land owners who are willing to aggregate the land parcel shall submit consent in NAINA office within 15 days from the date of publishing said Notice.

The area of Town Planning Scheme No. 2 is boundary shown in Blue Colour in the plan as detailed out in Annexure below :—

*ANNEXURE*

| Name of Town Planning Scheme | Village | Scheme Bounded by | Area (Ha) Approx. |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| Town Planning Scheme No. 2 (Pocket, No. 1) | Devad (Part) Bhokarpada (Part), (Chipale) Chipale (Part), Vihighar (Part) | *On the North—*<br>• Kalundre River upto Panvel Matheran foothill road.<br>• Northern boundary of Panvel- Matheran foothill road.<br>• Common boundary of village Chipale and Koproli.<br>*On theSouth—*<br>• Boundary of village Devad and Vichumbe.<br>• Common boundary of village Devad and Shivkar.<br>• Common boundary of village Bhokarpada (Chipale)<br>*On the East—*<br>• Common boundary of village Bhokarpada (Chipale) and Bonshet.<br>• Common boundary of village Chipale and Bonshet.<br>• Common boundary of village Chipale and Vihighar. | 166.00 |

| (1) | (2) | (3) | (4) |
|---|---|---|---|
| | | *On the West—*<br>• Mumbai-Pune Expressway. | |
| Town Planning Scheme No. 2 Pocket No. 2 (Non – contiguous reservation) | Sangade (Part) and Belavali (Part) | *On the North—*<br>• Boundary of Kirki River.<br>• Common boundary of village Chikhale and Sangade, Chikhale and Belavali (Part).<br>*On the South—*<br>• Boundary of proposed 10 Mtr. wide road connecting Mumbai Pune Expressway and MMC.<br>• Common boundary of village Sangade and Belavali (Part).<br>*On the East—*<br>• Proposed Multi Modal Corridor (MMC) (Part).<br>• Land of village Belavali (Part).<br>*On the West—*<br>• Tributary of Kirki River.<br>• Common boundary of village Sangade & Borle. | 28.00 |
| | | **Total** | **194.00** |

In accordance with the provisions of section 60 (3) of the said Act, a copy of the declaration along with the plan showing the area to be included in the Town Planning Scheme No. 2 is kept open for inspection of the public in the offices at the address given below during office hours on all working days. Copies of the plan showing the area to be included with also kept for inspection in the Grampanchayat offices of the villages included in the said Town Planning Scheme. Copy of the notice and plans are also available on CIDCO's website *http://cidco.maharashtra.gov.in/NAINA.aspx*

1. Additional Chief Planner (NAINA), 8th Floor, Tower No. 10, Belapur Railway Station Complex, CBD Belapur, Navi Mumbai 400 614.
2. Chief Architect and Planner, 4th Floor, Planning Department CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614.
3. CIDCO's registered office: Nirmal, 2nd Floor, Nariman point, Mumbai 400 021.
4. Concerned Grampanchyat offices.

By the order of Board of Directors of the Corporation,

V. VENU GOPAL,
Additional Chief Planner (NAINA).

*Regd. Office :* Nirmal, 2nd floor, Nariman Point,
Mumbai 400 021.

dated the 8th December 2017.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.